# बेनझीर भुट्टो

लेखक

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

A150

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**बेनझीर भुट्टो : डॉ. श्रीकांत मुंदरगी**
© **सुरक्षित**
**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# बेनझीर भुट्टो

*इस्लामी स्त्रीचा*
*चेहरामोहरा बदलून टाकणाऱ्या चरित्रनायिकेस*
*हे अक्षरसाहित्य*
*आदरपूर्वक अर्पण*

## प्रस्तावना

एक तपापूर्वी पाकिस्तानचे राष्ट्रप्रमुख जनाब झुल्फिकार अली भुत्तो यांना करण्यात आलेली अटक ही पाकिस्तानातल्या राजकीय रंगमंचावर घडत असलेल्या एका भीषण भयनाट्याची नांदी होती. त्यांचा कारावास ही एका विदग्ध व्यथेची चाहुल होतील. त्यांनी आपल्या लाडक्या लेकीच्या-बेनजीरच्या मदतीनं लष्करशाहीशी दिलेली झुंज आणि त्यांच्या राजकीय हत्येत झालेली त्याची परिणती ही एक शापित शोकांतिका होती. तर त्यानंतर दहा वर्षांनी पंतप्रधानपदाच्या सिंहासनावर त्यांच्याच या कन्येनं सन्मानपूर्वक आरूढ होणं, ही नियतीनं घडवून आणलेल्या कारुण्यमय कथेची सुखद सांगता होती. त्या कथेला शब्दांकित करण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न.

या शतकानं गोल्डा मेयर, इंदिरा गांधी, सिरिमाओ भंडारनायके, मार्गारेट थॅचर आणि ॲक्विनो कोरी यांच्यासारख्या अतिरिथी महारथी, कर्तृत्ववान स्त्रिया राष्ट्रप्रमुख झालेल्या पाहिल्या आहेत. त्यांचाच वारसा समर्थपणे पुढं चालवणारी स्त्री म्हणजे बेनजीर, असं म्हणणं म्हणजे बेनजीरच्या विलक्षण व्यक्तिमत्त्वावर अन्याय करण्यासारखं ठरेल. कारण बेनजीरनं एका क्रूर आणि कठोर लष्करशाहीशी दिलेल्या लढ्याला इतिहासांत तोड नाही, राजकारणात जोड नाही. म्हणूनच तिचं चरित्रलेखन करण्याच्या उद्देशानं तिची अनुमती घेण्यासाठी माझ्या कन्येचं-चि. मृणालिनीनं तिला लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे,

I am obsessed with the thought of writing your biography not just because you are a charismatic, beautiful and the youngest prime minister, but a political colossus, who has created history of its own kind in an Islamic nation in particular and in the world in general.You transcend all the women prime ministers and stand head and shoulder above others; for your courage and conviction, with which you put up the bravest battle against the cruel dictatrship for eleven long, gruelling years.

बेनजीर हा केवळ इस्लाम धर्मातला एक विलक्षण चमत्कार नसून विसाव्या शतकातल्या स्त्रीच्या अस्मितेचा अखेरचा अलौकिक आविष्कारच म्हणावा लागेल. तिचं व्यक्तिचित्र फक्त इस्लामी स्त्री जगतातच क्रांती घडवून आणू शकेल असं नव्हे तर साऱ्याच स्त्रीजातीला चैतन्य आणि प्रेरणा देणारं ठरेल.

बेनजीरच्या संदर्भात फारसं साहित्य आजवर प्रसिद्ध झालेलं नाही. तिनं लिहिलेलं आत्मचरित्र तर बऱ्याच अंशी एकांगी वाटतं. माझ्या विविध व्यापांमुळे मला बेनजीरविषयी समग्र माहिती गोळा करणं शक्य नव्हतं. म्हणून ती जबाबदारी मृणालिनीनं उचलली. शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयात १५/१५ तास बसून तिनं पाकिस्तानविषयीची सर्व पुस्तकं वाचून काढली, इस्लामधर्माचा अभ्यास केला आणि अविश्रांत परिश्रम करून पुस्तकाचा कच्चा आराखडा तयार केला. त्यामुळे त्याचं साहित्यकृतीत रूपांतर करणं मला सहजसाध्य झालं. माझी पत्नी सौ. सुहासिनी मुंदरगी हिचं सुवाच्य अक्षर आणि सुविचारांची जोड यामुळं 'बेनजीर' अल्पावधीतच अतिशय सुरेखपणे शब्दबद्ध झाली. आम्हा तिघांच्या परिश्रमाची ही फलश्रुती.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांनी बेनजीरच्या प्रकाशनाची जबाबदारी मोठ्या आनंदानं स्वीकारली. राजकीय विषयांवरची पुस्तकं प्रकाशित करणं हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच.

आणखी एक छोटंसं स्पष्टीकरण. बेनजीरला बेनझीर भुट्टो या नावानंच संबोधण्यात येतं. पण तिच्या विलोभनीय आणि देखण्या व्यक्तिमत्त्वाला हे संबोधन काहीसं कर्णकठोर वाटतं. म्हणून आम्ही तिचा उल्लेख बेनजीर भुत्तो या नावानंच पुस्तकांत केला आहे. या निर्णयस्वातंत्र्याबद्दल रसिक वाचक आम्हाला उदार मनानं क्षमा करतील अशी आशा.

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**

✦

# १. शोकांतिकेची सुरुवात

तिमिराची दुलई लपेटून सारं शहर निद्रेच्या कुशीत शांतपणे विसावलं होतं.

रावळपिंडीची गंमतच अशी असते. दिवसभर मोटरगाड्यांचे खडखडाट, रेल्वेगाड्यांचा धडधडाट अन् रस्त्यारस्त्यांतून लोकांचा गजबजाट. एकदा का मध्यरात्र उलटून गेली की टाचणी पडली, तरी ऐकू यावी, अशी नीरव शांतता सर्वत्र पसरते.

तीही मध्यरात्र अशीच होती. चंद्राचा मंद प्रकाश पावसाळी ढगांशी लपंडाव खेळत उंच उंच झाडांच्या माथ्यांवरून ओघळून घराघरांवर काही क्षण विसावायचा. मधूनच येणाऱ्या पावसाच्या सरींनी ओलसर झालेले डांबरी रस्ते त्या मंद प्रकाशात चमकायचे. दिवसभर गजबजून गेलेले ते रस्ते निर्मनुष्य झाले होते, रहदारीविना सुनेसुने झाले होते. वारा वाहत होता-जाणवेल, न जाणवेल, असाच. पालवी सळसळत होती-ऐकू येईन न येईल, अशीच. निर्झरांची खळखळ सुरू होती-कळेल, न कळेल, अशीच.

तरीसुद्धा ती मध्यरात्र नेहमीपेक्षा वेगळीच होती, बेनजीरच्या दृष्टीनं तर निश्चितच...

रात्री दीडचा सुमार असेल. पंतप्रधानांच्या निवासाची ती भव्य वास्तू आकाशाच्या पार्श्वभूमीवर एखाद्या नयनमनोरम चित्रासारखी भासत होती. मखमली पडदे लावलेल्या खिडक्याखिडक्यांतून कळे, न कळे पाझरणारा दाल दालनांतल्या रातदिव्यांचा प्रकाश त्या वास्तूच्या आकृतिबंधाची जाणीव करून देत होता. त्या वास्तूतल्या माणसांप्रमाणंच ती वास्तूही शांतपणे विसावली होती.

काही घटकांपूर्वी कुणी त्या निवासस्थानात डोकावलं असतं, तर तिथलं वातावरण अगदी वेगळंच दिसलं असतं. झुंबरं आणि हंड्यांचा लखलखाट सारं वातावरण उजळून टाकत होता. खिडक्यांच्या रंगीबेरंगी तावदानांवरून परावर्तित होणारा प्रकाश सप्तरंगांची उधळण करत होता. गप्पागोष्टींना ऊत आला होता. हसण्या–खिदळण्याचे आवाज तिथल्या आनंदात भर टाकत होते. हरतऱ्हेच्या पेयांनी भरलेल्या काचपात्रांचे किणकिणाट या साऱ्याला जणू पार्श्वसंगीताची जोड देत होते.

कुणीतरी फारच आग्रह धरला, म्हणून सनमनं, एका सिंधी गीताची लकेर हवेत हळुवारपणे भिरकावून दिली. माळेतले मोती घरंगळावेत, तशी. जमलेल्या साऱ्या मंडळींनी टाळ्यांचा कडकडाट करून तिला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

'तू इतकं चांगलं गातेस, हे ठाऊक असतं, तर बेटा, तुला इंग्लंडच्या म्युझिक स्कूलमध्येच घालून टाकलं असतं,' असं म्हणून झुल्फिकार अली नेहमीप्रमाणे गडगडाट करत हसले.

तेवढ्यात बेनजीरनं पपांना त्यांचं आवडतं गाणं म्हणण्याचा आग्रह केला. एव्हाना नुसरत बेगमनी पियानोवर बोट फिरवण्यास सुरुवात केली होती. त्या मधुर सुरांच्या साथीनं पप्पा गाऊ लागले :

के सेरा ऽ ऽ सेरा...
व्हॉटेव्हर विल्बी विल्बी
दी फ्यूचर इज नॉट अवर्स टु सी...

गेली चार महिने पाकिस्तानात चाललेलं वादळ अखेर शमलं, म्हणून आनंदोत्सव साजरा करण्यासाठी जमलेल्या मंडळींना भविष्यात काय वाढून ठेवलंय हे कळतं, तर...!

नियतीच्या खेळी अज्ञात असतात, म्हणूनच आलेला क्षण माणूस सुखानं जगू शकतो. पाकिस्तानला व्यापून टाकणारं हे राजकीय वादळ शमलं होतं, हे खरं; पण त्यानंतर येणाऱ्या झंझावाताची चाहूल मात्र कुणालाच लागली नव्हती. अन्यथा एकाहून एक चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना नादब्रह्मात तल्लीन झालेल्या मंडळींना ते अमृतमय क्षण विषासम भासले नसते का?

'उठा...उठा...जाग्या व्हा!' दबलेला अन् भयाकुल असा मम्मीचा आवाज ऐकून बेनजीर जागी झाली; पण तिच्या जडशीळ झालेल्या पापण्या उघडता उघडेनात.

'पिंकी, सनम, चटकन उठा. कपडे करा.'

मम्मीच्या त्या भेदरलेल्या आवाजानं धडपडून उठत बेनजीरनं विचारलं,

'काय...झालं तरी काय, मम्मी?'

'लष्क़रानं ताबा घेतलाय. उठा लवकर.'

'हे कसं शक्य आहे? हे कसं शक्य आहे?' बेनजीरचा आपल्या कानांवर विश्वासच बसत नव्हता. काही तासांपूर्वी तर सारं मिटल्याचा, विरोध संपल्याचा आनंदोत्सव इथं साजरा झाला होता आणि मम्मी सांगतेय, लष्करानं ताबा घेतलाय. कसं शक्य आहे हे?

असल्या प्रश्नांना राजकारणात मुळीच थारा नसतो, हे त्या अल्लड अन् अजाण मुलीला कळायला खूप अवधी जायला लागणार होता, खूप काळ जायला लागणार होता. तिचं स्वप्निल अन् सुंदर भावनाविश्वच उद्ध्वस्त झालेलं तिला पाहावं लागणार होतं.

एका भीषण भयनाट्याची ती नांदी होती...

एका शब्दातीत शोकांतिकेची ती सुरुवात होती...

एका विशब्द व्यथेची ती चाहूल होती...

सारं शहर झोपलेलं होतं. जागत होते,ते फक्त पहारेकरी, पंतप्रधानांच्या निवासस्थानाभोवती संगिनी हातांत घेऊन जागता पहारा देणारे. त्यांचे तीक्ष्ण कान त्या नि:शब्द अंधारात कानोसा घेत होते, अनोख्या चाहुलींचा. त्यांची तीक्ष्ण नजर त्या धूसर काळोखात शोध घेत होती, अनाहूत पावलांची. प्रत्येक प्राणिमात्रावर विजय मिळविणारी निद्रा त्या स्वामिनिष्ठ पहारेकऱ्यांना मात्र पराभूत करू शकत नव्हती. डोळ्यांची पापणीही लवू न देता ते पहारा देत होते, म्हणून तर त्यांचे स्वामी निर्वेधपणे विश्रांती घेत होते.

पण सारं आकाशच जेव्हा कोसळतं, तेव्हा आधार तरी कशाचा घ्यायचा?

पाहता पाहता अवजड लष्करी वाहनांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानाला गराडा घातला. त्यांत जीप्स होत्या, ट्रक्स होते. एवढंच नव्हे, तर टँक्सही होते. सैन्याची एखादी सुसज्ज तुकडी आकाशातून अवचित अवतीर्ण व्हावी, तसे अंधारातून ते अचानक आले होते. एक नव्हे, दोन नव्हे-शेकडो सैनिकांनी चहूबाजूंनी त्या घराला घेरलं होतं. त्यांच्या हातांत स्टेनगन्स होत्या, मशीनगन्स होत्या. मूठभर पहारेकऱ्यांच्या संगिनी कुठवर पुरणार? प्रतिकाराला काहीच अर्थ

नव्हता. झुंजण्याला वावच नव्हता. एक गोळीही न उडता, रक्ताचा एक थेंबही न सांडता लष्करी कारवाई पूर्ण झाली होती.

अंगावर गाऊन चढवून बेनजीर धावतच आपल्या पित्याच्या शयनगृहात गेली.

झुल्फिकार अली भुत्तो टेलिफोनजवळ बसले होते. त्यांचा चेहरा काहीसा चिंताग्रस्त दिसत होता. त्यांच्या भुवया आक्रसल्या होत्या. गोऱ्यापान विस्तीर्ण भालप्रदेशावर उभे राहिलेले घामाचे थेंब दिव्याच्या प्रकाशात चमकत होते.

आपल्या वडिलांना अशा अवस्थेत पाहून बेनजीरच्या पायांतलं बळच सरल्यासारखं झालं. दरवाज्यात ती खिळून उभी राहिली.

फोनची रिंग वाजली. एरवी कोमल वाटणारा तो आवाज साऱ्यांच्या काळजाचा ठेका चुकवून गेला. तो फोन शिक्षणमंत्री हाफिज पीरजादा यांच्या घरून आला होता. त्यांची मुलगी फोनवर बोलत होती. बोलत होती, म्हणण्यापेक्षा हुंदके देता देता काही शब्द तिच्या तोंडून उमटत होते, असंच म्हणावं लागेल. तिच्या वडिलांना सैनिकांनी मारहाण करून पकडून नेल्याचं तिनं कसबसं सांगितलं.

'शांत हो...शांत हो!' भुत्तोंनी तिला धीर दिला, 'घराण्याची शान जाईल, अशी वागू नकोस...' बोलत असतानाच फोन बंद पडला.

भुत्तोंनी लागलीच शेजारचा दुसरा फोन उचलला. तोही फोन बंदच होता.

बेनजीरनं मम्मीकडं पाहिलं.

तिचा चेहरा पांढरा फटक पडला होता.

ती म्हणाली,

'याचा अर्थ त्यांनी आपले सारेच फोन बंद करून टाकलेले दिसतात.'

इतक्यात भुत्तोंचा वैयक्तिक सेवक उर्स धावत आत शिरला. धापा टाकत घाबरलेल्या आवाजात तो भुत्तोंना विनवू लागला,

'साहिब...साहिब...'

त्याचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच भुत्तो म्हणाले,

'मला कळलंय. सेनेनं घराला वेढलंय.'

हे एवढ्यावरच थांबणार नव्हतं. सैन्याची नजर चुकवून, पोटावर सरपटत जिवाच्या करारावर आत शिरलेल्या एका रक्षकानं उर्सला जागं करून, सैनिक भुत्तोंना ठार मारण्यासाठी आले आहेत, असंच सांगितलं होतं. आपल्या